आर्थिक गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड
पोलीस आयुक्तालय, चिंचवड, पुणे
फोननंबर- (020) 26209157
pieow.pcpc-mh@gov.in

# प्रेसनोट ता. २१/०३/२०२२

## एच.यु.एफ. इंडीया प्रा.लि. कंपनीत कोटयावधी रुपयाचा अपहार करणा-या उच्च कंपनीतील अधिकारी यांना अटक

सन २०१० ते माहे मे/२०२० या कालावधी एचयुएफ इंडीया प्रा.लि. नानेकरवाडी, चाकण, ता.खेड, जि.पुणे येथील उच्च पदावर काम करीत असलेले पदाधिकारी यांनी मोठया प्रमाणात पैशाचा अपहार केल्याने तक्रारदार संदिप जगदिश चौधरी, वय ४५ वर्षे, कामधंदा-नोकरी, रा.गट नं.३०४, ३०५ नानेकरवाडी, ता.खेड, जि.पुणे यांनी व्यवस्थापकीय संचालक सुनिल कुमार गर्ग, फायनांन्स हेड निखील अगरवाल, ऑपरेशन संदिप वाणी व आटी हेड विशाल टमोटीया यांनी सर्वांनी मिळुन आपआपले पदाचा गैरवापर करुन, स्वताचे आर्थिक फायदयासाठी, आपआपसात संगणमत करुन, कंपनीचे इतर डायरेक्टर व जर्मनी येथील मुख्य कंपनी एच.यु.एफ हल्सबेक ॲण्ड फुर्स्ट जीएमबीएच ॲण्ड कंपनी केजी, बेल्बर्ट यांना कंपनीचे परचेस हेड श्रीपाद कुलकर्णी व त्यांचे टिमला कोणतीही माहीती न देता १७० व १७२ या खोटया परचेस ऑर्डस सिरीज तयार करुन, त्याव्दारे वेगवेगळया व्हेन्डरकडुन खोटे इनव्हाईस घेवुन, त्या इनव्हाईसवर एच.यु.एफ. इंडीया प्रा.लि.चा खोटा स्टॅम्पचा वापर करुन, खोटे गुडस रिसीट नोटस (जीआरएन) बनवुन, इनव्हाईसमधील माल कंपनीमध्ये न आणता मेनगेट रजिस्टरमध्ये खोटया नोंदी करुन, सदरच्या इनव्हाईस मधील मालाचे बिलाची रक्कम सर्व व्हेन्डरला कंपनीचे बँक खात्यामधुन दिली. तसेच वेगवगेळया एनजीओला आवश्यक नसताना देखिल डोनेशन व सीएसआरव्दारे मोठया प्रमाणात रक्कम देवुन व अशाच वेगवेगळया प्रकारचे इतर गैरव्यवहार करुन, एचयुएफ इंडीया प्रा.लि.कं ची एकुन अंदाजे १३९ कोटी रुपयेची आर्थिक फसवणुक केलेली आहे व सदरची रक्कम वेगवेगळया मार्गाने स्वतःचे व कुटुंबियांचे नावे घेवुन स्वताचे आर्थिक फायदयासाठी वापरुन एचयुएफ इंडीया प्रा.लि.कं च्या पैशाचा अपहार केला म्हणुन फिर्यादी यांनी वरील आरोपी विरुध्द दिनांक १४/०३/२०२२ रोजी फिर्याद दिल्याने गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दाखल गुन्हयाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडील पोलीस निरीक्षक व्हि.एस. धुमाळ या करीत असताना त्यांनी आरोपींचा शोध घेण्यासाठी आर्थिक गुन्हे शाखे कडील पोलीस उप निरीक्षक समीर दाभाडे व पो.हवा अमित गायकवाड यांनी आरोपींचे मोबाईल नंबरचे तांत्रिक विश्लेषन केले असता आरोपींची माहिती मिळताच आर्थिक गुन्हे शाखेकडील टिम तयार करुन आरोपींचे लोकशन नुसार मिळाले माहितीप्रमाणे टिमला योग्य त्या सुचना देवुन वरिष्ठांचे आदेशान्वये आरोपींचा शोध घेण्यासाठी पाठविले. आर्थिक गुन्हे शाखेकडील टीमने मा.वरिष्ठांचे सुचनेप्रमाणे मिळालेल्या माहितीनुसार सदर ठिकाणी गुन्हयातील पाहिजे आरोपी १)विशाल विनयकुमार टमोटिया २)निखील नरेंद्रकुमार आगरवाल ३)संदिप राधाकृष्ण वाणी हे मिळुन आल्याने त्यांना तात्काळ ताब्यात घेवुन आर्थिक गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड येथे आणुन त्यांचेकडे दाखल गुन्हयाचे अनुषंगाने चौकशी केली असता त्यांचा दाखल गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना दिनांक १४/०३/२०२२ रोजी अटक करण्यात आली आहे.

दाखल गुन्हयामधिल अटक आरोपी १)विशाल विनयकुमार टमोटिया, वय ४५ वर्षे, रा.कुमार प्रिन्स व्हिला, सी-१, ८०१, मोशी, पुणे २)निखील नरेंद्रकुमार आगरवाल, वय ४५ वर्षे, रा.कल्पतरु हॉरमनी, सी- ३०५,

कस्पटेवस्ती, वाकड, पुणे व ३)संदिप राधाकृष्ण वाणी, वय ५६ वर्षे, रा.संत गार्डन, फ्लॅट नं.ए/४०१, लिंक रोड, चिंचवड, पुणे याचेकडून आजपावेतो **एकुण १७,७४,९००/- रुपयाचा मुद्देमाल** हस्तगत करण्यात आला आहे. गुन्हयातील आरोपी हे उच्चशिक्षीत असुन स्वतः च्या पदाचा गैरवापर करुन कंपनीत गैरव्यवहार करज

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री कृष्ण प्रकाश, अपर पोलीस आयुक्त डॉ संजय शिंदे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, डॉ काकासाहेब डोळे, सहायक पोलीस आयुक्त गुन्हे डॉ.प्रशांत अमृतकर यांचे मार्गदर्शनाखाली आर्थिक गुन्हे शाखेकडील पोलीस निरीक्षक वनिता धुमाळ, सहायक पोलीस निरीक्षक आनंद अनगळ, गणेश पवार, पोलीस उप निरीक्षक समिर दाभाडे, मंजुशा शेलार, सतेज जाधव, सहायक पोलीस फौजदार राजेंद्र शेटे, पोलीस हवालदार प्रमोद लांडे, सुनिल गवारी, अमित गायकवाड, प्रदिप वासाळे, संतोष चांदणे, नागेश माळी, पोलीस अंमलदार भास्कर दिघे,सिध्देश्वर सोनटक्के तसेच महिला पोलीस अंमलदार प्रिया वसावे, रेनुका वाव्हळ यांचे पथकाने कली आहे.